ठळक बातम्या

- संविधान दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम
- २६ -११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्यांना देशाची आदरांजली
- २०२५-२६ या वर्षात देशात अन्नधान्याचं ३७ कोटी ८० लाख टन इतकं विक्रमी उत्पादन / चालू खरीप हंगामातही अन्नधान्य उत्पादनात वाढ होण्याचा अंदाज
- नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया जगातला तिसऱ्या क्रमांकाचा सूचीबद्ध शेअर बाजार

आणि

- आशियाई चषक महिला हॉकीस्पर्धेच्या उपान्त्य फेरीत भारताचा सामना मलेशियाबरोबर होणार

<><><><><><><>

संविधान दिनाचा आज ७७वा वर्धापन दिन आहे. संविधान दिनानिमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी समाज माध्यमावर शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दूरदृष्टी, प्रज्ञा आणि समर्पणातून संविधानाची जडणघडण झाली आणि भारतीय प्रजासत्ताकाचा पाया रचला गेला, अशा शब्दात उपराष्ट्रपतींनी आदरांजली वहिली आणि न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या घटनात्मक आदर्शांप्रति सर्वांनी आपली बांधिलकी पुन्हा दृढ करण्याचं आवाहन केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. समाज माध्यमावरच्या संदेशात ते म्हणाले की, संविधानाच्या रुपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली भेट ही भारतीय लोकशाहीचा एक अमूल्य वारसा आहे. विकसित भारत घडवण्याचा संकल्प पूर्ण करण्याच्या दिशेने हे संविधान सदैव मार्गदर्शन करत राहील, असं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री

अमित शहा यांनी संविधान दिनानिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद आणि भारतीय राज्यघटना तयार करण्यात अमूल्य योगदान देणाऱ्या संविधान सभेच्या इतर सर्व सदस्यांना त्यांनी आदरांजली वाहिली आहे. भारताची राज्यघटना ही जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ आहे. ती प्रत्येक नागरिकाला समान संधी आणि सन्मानानं जगण्याचा अधिकार प्रदान करते, असं शहा समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत. भारतीय संविधान दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी मुंबईत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं. संविधान दिनानिमित्त आज मंत्रालय, इतर सरकारी-निमसरकारी कार्यालयं, शाळा तसंच महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं.

महाराष्ट्रात संविधान दिनानिमित्त मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा प्रारंभ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. राज्यातल्या ग्रामीण भागातल्या युवक, युवती आणि शेतकऱ्यांना पशुधनाधारित व्यवसायांच्या माध्यमातून उद्योजक बनवणाऱ्या या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज आजपासून स्वीकारले जातील. योजनेची सविस्तर माहिती पशुसंवर्धन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संविधान दिनानिमित्त आज हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गडकिल्ले संवर्धन आणि स्वच्छता अभियानाचं लोकार्पण करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत पुणे जिल्ह्यातल्या राजगड, शिवनेरी आणि लोहगड या तीन किल्ल्यांवर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. संविधान दिनानिमित्त राज्यात विविध ठिकाणी संविधान सन्मान दौड, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम आणि व्याख्यानाचं आयोजन करण्यात आलं असून संविधानाच्या उद्देशिकेचं सामुहिक वाचन केलं जात आहे.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यात हुतात्मा झालेल्या जवानांना आणि नागरिकांना आज देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे.

या दहशतवादी हल्ल्यादरम्यान निर्भयपणे लढलेले शूर जवान, पोलीस कर्मचारी आणि इतर सर्वांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज आदरांजली वाहिली. सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये राष्ट्रपतींनी म्हटलं आहे की, या सैनिकांचं बलिदान आणि सेवा देशवासीयांच्या आठवणीत कायम राहील.

मुंबईवरील भ्याड दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या निष्पाप नागरिकांना आणि त्या भ्याड हल्ल्याला तोंड देणाऱ्या सुरक्षा जवानांच्या अतुलनीय धैर्याला उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी सलाम केला. सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्ध 'झीरो टॉलरन्स' धोरण राबवण्याबाबत आणि या हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना शिक्षा देण्याबाबत भारत पूर्णपणे कटिबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं.

२६ नोव्हेंबर रोजी मुंबईवर झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांशी लढताना शहीद झालेल्या जवानांना राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आदरांजली वाहिली. पोलीस मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती आणि इतर अधिकारी उपस्थित होते. पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी राज्य शासनानं विविध निर्णय घेतल्याचं यावेळी मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितलं. वर्मा आणि फडणवीस यांनी २६/११ हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिसांच्या कुटुंबीयांचीही यावेळी भेट घेतली.

<><><><><><><>

दहशतवादी हल्ल्याला धैर्याने तोंड देणाऱ्या सर्व शूर सैनिकांच्या आणि निष्पाप नागरिकांच्या बलिदानाप्रति राष्ट्र कृतज्ञ आहे, अशा शब्दात लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी मुंबई दहशतवादी हल्ल्यातल्या शहीदांना आदरांजली वाहिली. २६/११ हा दिवस आपल्याला दहशतवादाविरोधात एकत्र राहण्याची, राष्ट्रीय सुरक्षेबाबत सतर्क राहण्याची आणि शांतता तसंच मानवी मूल्यांचं रक्षण करण्याचा आपला निर्धार अधिक दृढ करण्याची प्रेरणा देतो, असंही ते म्हणाले.

दहशतवादाविरोधात ठामपणे उभ्या राहिलेल्या पोलीस आणि सुरक्षा दलांच्या शौर्याला, पराक्रमाला आणि निष्ठेला आमचा सलाम आहे. दहशतवाद समूळ नष्ट करण्याच्या आपल्या निर्धारावर भारत ठाम असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे.

दहशतवाद हा मानवतेविरुद्धचा अत्यंत घृणास्पद गुन्हा आहे. मोदी सरकारच्या दहशतवादाविरोधातील शून्य सहिष्णुता धोरणाचं जगभरात कौतुक होत असल्याचं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे.

दहशतवादाच्या सर्व प्रकारांविरुद्ध लढण्यासाठी आणि त्यात सहभागी असलेल्यांना कठोर शिक्षा देण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे.

<><><><><><><>

अन्नधान्याचं विक्रमी उत्पादन यंदा झालं असल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत दिली. २०२५-२६ या वर्षात अन्नधान्याचं ३७ कोटी ८० लाख टन उत्पादन झालं असून गेल्या वर्षाच्या तुलनेत ते २०३ लाख टनांनी जास्त आहे. जगातला सर्वात मोठा भात उत्पादक देश हे स्थानही भारतानं सलग दुसऱ्या वर्षी कायम राखलं आहे. यंदा

देशात १५ कोटी ५० लाख टन भात उत्पादन झालं असून गेल्या वर्षीच्या तुलनेत ते ४९ लाख ७० हजार टनांनी जास्त आहे.

गव्हाच्या उत्पादनाबाबतही भारतानं जगात दुसरा क्रमांक राखला आहे. गेल्या वर्षीपेक्षा २७२ लाख टनांनी गव्हाच्या उत्पादनात वाढ झाली असून ते १२ कोटी २० लाख टन झालं आहे.

२०२६-२७च्या खरीप हंगामातल्या पीक उत्पादनाचा पहिला अंदाजही त्यांनी जाहीर केला. महाराष्ट्र कर्नाटक, तेलंगण आणि आंध्र प्रदेशात यंदा प्रतिकूल हवामान आणि दुष्काळ असूनही ५ वर्षांतल्या सरासरी उत्पादनापेक्षा जास्त उत्पादन होईल, असं ते म्हणाले.

बाईट-शिवराजसिंह चौहान

<><><><><><><>

बाजार भांडवलाच्या बाबतीत नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सूचीबद्ध स्टॉक एक्सचेंज ठरला आहे. जर्मनीच्या ड्यूश बोर्स आणि लंडन स्टॉक एक्सचेंज ग्रुपला एनएएसईनं मागं टाकलं आहे. ताज्या बाजार आकडेवारीनुसार, एनएसईचं बाजार भांडवल ६४ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त आहे. हे प्रमाण ड्यूश बोर्सच्या ६३ अब्ज डॉलर्स आणि लंडन स्टॉक एक्सचेंज ग्रुपच्या ६२ अब्ज डॉलर्सच्या तुलनेत अधिक आहे. २४ सप्टेंबर रोजी सूचीबद्ध झाल्यापासून एनएसईच्या शेअर्समध्ये सुमारे ३२ टक्क्यांची वाढ झाली आहे.

<><><><><><><>

महिला आशियाई हॉकी अजिंक्यपद चषक स्पर्धेत भारताच्या हॉकी संघानं जपानवर ४-० असा सहज विजय मिळवला. दीपिकानं २, तर लालरेमसियामी आणि नेहा यांनी प्रत्येकी १ गोल केला. दुसऱ्या सामन्यात मलेशियानं थायलंडवर

४-० अशी मात केली, तर चीननं कोरियाचा १-० असा निसटता पराभव केला. उद्या उपांत्य फेरीत भारताचा सामना मलेशियाबरोबर होणार आहे.

//<><><><><><><>//